कालमर्यादा/अत्यंत तातडीचे

**गोपनीय**

क्र.पोमसं/२/१०२०/नि.नि.सू.-२०१८-१९/१४४/२०१८ मुंबई, दिनांक : २८/०६/२०१८

**विषय :-** पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) पदावर पदोन्नती देण्यासाठी नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांची सन २०१८-२०१९ ची निवडसूची

---ooo---

**प्रस्तावना :-**

पोलीस उप अधीक्षक /सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) पदावर पदोन्नती देण्यासाठी नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांची सन २०१८-१९ ची निवडसूची तयार करण्याकरिता पदोन्नतीच्या विचारकक्षेत असलेल्या अधिकाऱ्यांची माहिती मागविण्यात येत आहे. तथापि, सदर अधिकाऱ्यांची माहिती पाठवितांना काही घटक प्रमुख हे अपूर्ण माहिती पाठवितात, किंवा उशिराने पाठवितात, किंवा पाठवतच नाहीत. त्यामुळे सदर अधिकाऱ्यांचा पदोन्नती देतांना गंभीर स्वरुपाच्या प्रशासकीय अडचणी निर्माण होतात. त्यामुळे बऱ्याच अधिकाऱ्यांची प्रकरणें खुली ठेवावी लागतात. तसेच, सदर निवडसूचीवर पदोन्नती न मिळाल्यामुळे ते अधिकारी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणापुढे दावे दाखल करतात. तसेच, मानीव दिनांकाबाबतची प्रकरणें उद्‌भवतात. अशा बाबींना प्रतिबंध करण्याची बाब या कार्यालयाच्या विचाराधिन होती. त्यास अनुसरुन सदर अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याकरिता या कार्यालयाकडून कालबध्द कार्यक्रम आखण्यात आला आहे.

२. तरी सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, पदोन्नतीच्या विचार कक्षेत असलेल्या अधिकाऱ्यांबाबतची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये परिपूर्ण भरुन <u>ती माहिती संबंधीत लिपीकार्ने स्वत: पोलीस महासंचालक कार्यालय, म.रा., मुंबई (कार्यासन क्र. २) यांच्याकडे आणून द्यावी.</u> तसेच, संबंधीत लिपिक गैरहजर असल्यास, कार्यालय अधीक्षकांनी ती माहिती समक्ष आणून द्यावी. तसेच, कार्यालय अधीक्षक गैरहजर असल्यास पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय) यांनी सदरची माहिती आणून द्यावी. तसेच, सदरची माहिती ही मराठी मध्ये (DVBW-TTSurekh) या फॉंट मध्ये टंकलेखीत करुन <u>ती सॉफ्ट कॉपी, व हार्ड कॉपी मध्ये आणावी.</u> सदरची माहिती विहित मुदतीत सादर करण्याच्या अनुषंगाने घटक कार्यालयाचे नांव, व पोलीस महासंचालक कार्यालयामध्ये उपस्थित राहण्याबाबतचा दिनांक, व वेळ नमूद असलेली कालबध्द कार्यक्रमपत्रिका सोबत जोडली आहे. तरी, सदर कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे

संबंधीत अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी यांनी या कार्यालयामध्ये उपस्थित राहून माहिती सादर करावी. वेळापत्रकाचे अनुपालन न केल्यास त्याची गांभीर्याने दखल घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

३. सर्व घटक प्रमुखाना सूचना देण्यात येते की, नमूद यादीतील अधिकाऱ्यांविरूध्द सुरू असलेल्या विभागीय चौकशी तातडीने पूर्ण करून घ्याव्यात व त्यांच्या निष्कर्षाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. तसेच, कारणे दाखवा नोटीस अथवा कसुरी अहवाल प्रलंबित असल्यास त्याबाबत त्वरीत निर्णय घेऊन प्रकरणांची निर्गती करावी. सर्व अधिकाऱ्यांचे सेवापुस्तक पडताळून यापुर्वी दिलेल्या शिक्षांची अंमलबजावणी पूर्ण झाली अगर कसे याची खात्री करावी व ती बाब स्पष्टपणे नमूद करावी.

४. पदोन्नतीच्या विचार कक्षेत असलेल्या अधिकाऱ्यांची माहिती खाली नमूद करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे विवरणपत्रामध्ये परिपूर्ण भरुन ती या कार्यालयास सादर करण्यात यावी.

| अ.क्र | मुद्दा | शेरा |
|---|---|---|
| १. | पोलीस निरीक्षकाचे पूर्ण नांव | सेवापुस्तकानुसार खात्री करावी |
| २. | जात | सेवापुस्तकानुसार खात्री करावी |
| ३. | जन्म दिनांक | सेवापुस्तकानुसार खात्री करावी |
| ४. | सेवानिवृत्तीचा दिनांक | सेवापुस्तकानुसार खात्री करावी |
| ५. | मूळ जिल्हा | सेवापुस्तकानुसार खात्री करावी |
| ६. | जात वैधता प्रमाणपत्र | जात वैधता प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक, तसेच जात पडताळणी समितीचे नांव इत्यादि माहिती नमूद करुन त्याची प्रत जोडावी. तसेच, सदर अधिकाऱ्याने जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्यास ते मिळविण्यासाठी त्याने काय प्रयत्न केले, याबाबत त्याचेकडून लेखी खुलासा घेऊन तो या कार्यालयास पाठवावा. त्याचप्रमाणे, एखाद्या अधिकाऱ्याने मागासवर्गीय असल्याचे जात प्रमाणपत्र/ वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास नकार दिल्यास, त्या अधिकाऱ्याकडून त्याप्रमाणे स्पष्ट लेखी निवेदन प्राप्त करून घेवून ते या कार्यालयास पाठवावे. तसेच एखादा अधिकारी पदोन्नती टाळण्याच्या दृष्टीने जात वैधता प्रमाणपत्र देण्याचे टाळत असल्यास त्या अधिकाऱ्याची अकार्यकारी पदावर नेमणूक करावी, व तसे या कार्यालयास कळवावे. |
| ७. | सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठाची प्रत. | प्रत जोडावी |
| ८. | पोलीस उप निरीक्षक पदापासूनच्या नेमणुकांचा सलग तपशील (सेवातपशील) | संपूर्ण सेवातपशील जोडावा. |
| ९. | संबंधीत नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांविरूध्द विभागीय | सदर अधिकाऱ्यांविरुध्द प्रलंबित/प्रस्तावित असलेल्या प्रा.चौ./ वि.चौ./न्यायालयीन प्रकरणांबाबतची |

| अ.क्र | मुद्दा | शेरा |
|---|---|---|
| | /संक्षिप्त चौकशी/इतर चौकशी/ न्यायालयीन प्रकरणें/ शिक्षा प्रलंबित/ प्रस्तावित असल्यास त्याबाबतचा तपशील | माहिती नमूद करावी. त्यामध्ये थोडक्यात कसुरी स्पष्ट नमूद करावी. तसेच, विभागीय चौकशी आदेशित करण्यात आली असल्यास आदेश क्रमांक व दिनांक नमूद करावा. तसेच, विभागीय चौकशीची कागदपत्रें दुसऱ्या घटकाकडे वर्ग करण्यात आली असल्यास पत्राचा क्रमांक व दिनांक नमूद करावा. मोघम/संदिग्ध माहिती देण्यात येऊ नये. |
| १०. | सदर अधिकारी शिक्षा भोगत असल्यास सदर शिक्षा केव्हा सुरू झाली, व केव्हा संपणार आहे, त्याबाबतच्या माहितीसह सद्य:स्थितीची सविस्तर माहिती. | सदर अधिकाऱ्यास वेतनवाढ रोखण्याच्या शिक्षा देण्यात आलेल्या असल्यास, सदर शिक्षा केव्हा सुरु झाल्या, व केव्हा संपणार आहेत, याबाबत दिनांक नमूद करावा. शिक्षा उपभोगुन पूर्ण झाली असल्यास त्याबाबतची माहिती देण्यात येऊ नये. तसेच सदर अधिकाऱ्यास देण्यात आलेल्या शिक्षेची अंमलबजावणी विहित मुदतीत पूर्ण झाली नसल्यास त्यास जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करावी, व त्याबाबतचा अहवाल सोबत पाठवावा. तसेच, सदर शिक्षेची अंमलबजावणी मागील दिनांकास दर्शवून वेतन पुनर्निश्चिती करण्यात येऊन त्याबाबतच्या आदेशांची प्रत सोबत जोडावी. |
| ११. | दिनांक ३१.३.२०१८ पर्यंतचे मत्ता व दायित्व सादर केल्याबाबतचा तपशील | या कार्यालयातील कार्यासन क्र. ३ यांच्याकडे पाठवावा. तसेच, सदर पत्राची प्रत माहितीकरिता कार्यासन क्र.२ यांना पाठवावी.<br>तसेच, एखादा अधिकारी पदोन्नती टाळण्याच्या दृष्टीने मत्ता व दायित्वाचे विवरणपत्र देण्याचे टाळत असल्यास त्या अधिकाऱ्याची अकार्यकारी पदावर नेमणूक करावी, व तसे या कार्यालयास कळवावे. |

( संदीप बिश्नोई )
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक (का. व सु), मुंबई / गुन्हे अन्वेषण विभाग, म. राज्य, पुणे / प्रशिक्षण व खास पथकें, म. राज्य, मुंबई / लोहमार्ग, मुंबई / दहशतवाद विरोधी पथक, मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
इतर सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण, मुंबई/ फोर्स वन, मुंबई/(नविअ) नागपूर.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधिक्षक (लोहमार्गसह)
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालयें

प्रत तातडीच्या समान कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित:-
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी.

प्रत,

कार्यासन अधिकारी, का. क्र. ३

२. सोबत जोडलेल्या यादीतील मागासवर्ग प्रवर्गातील असलेल्या नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांना ते सदर पदाच्या पदोन्नती कक्षेत असताना ते आरक्षणाचा लाभ मिळवून सेवाज्येष्ठता यादीमध्ये वरच्या स्थानावर आले किंवा कसे, याबाबतची माहिती विभागीय पदोन्नती समितीकडे सादर करण्याकरिता या कार्यासनास सत्वर पाठवावी.

३. सोबत जोडलेल्या यादीतील पोलीस निरीक्षकांनी दि. ३१/०३/२०१८ पर्यंतची मत्ता व दायित्व विवरणपत्रें सादर केल्याबाबतची माहिती या कार्यासनास वेळोवेळी/तातडीने कळवावी.

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष.

२. प्रस्तुत ज्ञापन "पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) पदावर पदोन्नती देण्यासाठी सन २०१८-१९ ची निवडसूची तयार करण्याबाबत" या लेखा शिर्षाखाली पुढील दोन महिन्याकरिता प्रसिध्द करावे.